विषय :- कोरोना विषाणू संसर्गाचा प्रादूर्भाव रोखणे तसेच कोरोना विषाणू रोगाचा प्रसार टाळण्यासाठी प्राधिकरण कार्यालयात नागरिकांना प्रवेश बंद करण्याबाबत.

१. प्राधिकरणातील ज्या विभागाशी संबंधित कामकाज असेल त्या विभागाचे संबंधित विभागप्रमुखांनी त्यांची स्वाक्षरी असलेली लेखी परवानगी /पास संबंधित अभ्यागतांचे नावासह दिल्यानंतरच विशेष बाब म्हणून प्रवेश द्यावा.

२. प्रवेश द्यावयाचे नागरिकांनी मास्क परिधान केलेला असणे आवश्यक आहे.

३. प्रवेश केल्यानंतर मुख्यालयामधील स्वच्छतागृहामध्ये जाऊन सॅनिटायझरचा वापर करावा अथवा साबनाने /हँड वॉशने स्वच्छ हात धुऊन नंतरच कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडे जाणेबाबत सुरक्षा कर्मचारी यांनी समक्ष सूचना द्याव्यात. तसेच कामकाज पूर्ण झालेनंतर लगेच कार्यालय सोडणेबाबत सूचना द्याव्यात. नागरिक अथवा इतर व्यक्ती जास्त वेळ विभागात रेंगाळणार नाही याची दक्षता बोलविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याने घ्यावयाची आहे.

४. प्राधिकरण कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी आणि विभागप्रमुखांनी लेखी परवानगी दिलेल्या नागरिकांशिवाय इतरांना सुरक्षा विभागाने कार्यालयात प्रवेश देवू नये.

५. अभ्यागंत/नागरिक इ. यांनी प्रत्यक्ष कार्यालयात न येता आपले म्हणणे /तक्रार /सूचना ह्या लखी स्वरूपात ई-मेलव्दारे pcntda@yahoo.in या मेलवर पाठवाव्यात.